7

2

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र

क्र. प्र.अभि. / 1055 / ना.प्र.सं. व सं. केंद्र दिनांक

विषय:- एनर्जी कन्झर्वेशन बिल्डींग कोड व ग्रीन बिल्डींग या विषयी एक दिवसीय कार्यशाळेसाठी नामनिर्देशन देण्याबाबत.

------------

महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाराष्ट्र शासनाची संस्था) विभागामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यरत असणा-या अधिकारी, अभियंते यांजकरितां एनर्जी कन्झर्वेशन बिल्डींग कोड व ग्रीन बिल्डींग या विषयी एक दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे.

बी.इ.इ. भारत सरकार यांनी सन 2007 मध्ये एनर्जी कन्झर्वेशन बिल्डींग कोड राष्ट्रीय स्तरावर जाहीर केला असून उर्जा संवर्धन कायद्यातील कलम 14 (पी) व 2010 मधील सुधारित तरतूदींनुसार 120 केव्हीए विद्युतभार मागणी असणा-या किंवा 100 किलो व्हॅट विद्युत भार जोडणी असणा-या वाणिज्य इमारतींना एनर्जी कन्झर्वेशन बिल्डींग कोड लागू होणार आहे.

बी.इ.इ. भारत सरकार यांनी 12 व्या पंचवार्षिक योजनेत महाराष्ट्र राज्यासह आठ राज्यांत या कोडची अंमलबजावणी बंधनकारक करणार असल्याचे सूचित केले आहे.

या अंतर्गत महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण यांच्यामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध खात्यांमध्ये काम करणा-या अधिकारी, अभियंते यांजकरिता (स्थापत्य आणि यांत्रिकी व विद्युत) एक दिवसीय जनजागृती कार्यशाळेचे आयोजन ना.प्र.सं.व सं.केंद्र येथे करण्यात येत आहे. ही जनजागृती कार्यशाळा खाली नमूद केलेल्या खात्यातील अधिकारी / अभियंते यांच्यासाठी आयोजित करण्यांत येणार आहे:-

(महानगरपालिका वास्तुशास्त्रज्ञ ) खाते, प्रमुख अभियंता (इमारत परिरक्षण) खाते, नगर अभियंता खाते, प्रमुख अभियंता (विकास नियोजन ) खाते, प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) खाते, प्रमुख अभियंता (यांत्रिक व विद्युत) खाते, प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रचालन) खाते, प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रकल्प) खाते, जल अभियंता खाते, प्रमुख अभियंता (मुंबई मलनि:सारण प्रकल्प) खाते , प्रमुख अभियंता (पर्जन्य जलवाहिन्या) खाते . प्रमुख अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) खाते, प्रमुख अभियंता (दक्षता) खाते

यास्तव सर्व खाते प्रमुखांना विनंती करण्यात येते कि आपल्या खात्यातील कार्यरत अधिकारी / अभियंते यांचे नावे सदर कार्यशाळेसाठी खालील तक्त्यात भरुन प्रमुख अभियंता (ना.प्र.सं.व सं केंद्र) येथे त्वरीत पाठवून देण्यात यावी.

| क्र. | कर्मचा-याचे नाव | कर्मचारी संकेतांक | पदनाम | कार्यालय दूरध्वनी क्रमांक | कर्मचा-याचा भ्रमणध्वनी क्रमांक | कर्मचा-यांचा ई-मेल पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | |

तसेच नामनिर्देशित अभियंत्यांची माहिती ई- मेलद्वारे या कार्यालयास (ई- मेल Address – ctirc.bor@gmail.com) कळविण्यात यावी.

सदर कामकाज अत्यंत तातडीचे समजण्यात यावे.

05.09.2015
प्रमुख अभियंता (ना.प्र.सं.व सं.केंद्र)

1) (महानगरपालिका वास्तुशास्त्रज्ञ ) खाते
2) प्रमुख अभियंता (इमारत परिरक्षण) खाते
3) नगर अभियंता खाते
4) प्रमुख अभियंता (विकास नियोजन ) खाते
5) प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) खाते
6) प्रमुख अभियंता (यांत्रिक व विद्युत) खाते
7) प्रमुख अभियंता (मलनिःसारण प्रचालन) खाते
8) प्रमुख अभियंता (मलनिःसारण प्रकल्प) खाते
9) जल अभियंता खाते
10) प्रमुख अभियंता (मुंबई मलनिःसारण प्रकल्प) खाते
11) प्रमुख अभियंता (पर्जन्य जलवाहिन्या) खाते
12) प्रमुख अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) खाते
13) प्रमुख अभियंता (दक्षता) खाते

तात्काळ

No. CHE/DP/ 28466/Estt. 11-9-15

बृहन्मुंबई महानगर पालिका
प्रमुख अभियंता (विकास नियोजन)
यांचे कार्यालय
23466
– 8 SEP 2015
क्र.प्र.अ./वि.नि./ 028466
साधारण | शहर | पूर्व उप | प. उप
न. अभि. | टिप्पणी | ... | अस्था

DyCE(BP)WS I/II/City/ES/spl.cell.
Pl. depute the officers for training
8/09

प्रमुख अभियंता
(विकास नियोजन)